# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/11/2023 (सोमवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या इसमांविरूद्ध पोलीस स्टेशन पारशिवनी यांची कारवाई

दिनांक १२/११/२०२३ चे ०२.३० वा. ते ०३.२० वा. सुमारास पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीत मौजा करंभाड शिवार संग्राम ढाबा जवळ अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक ट्रॅक्टर वाहनाने होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मौजा करंभाड शिवार संग्राम ढाबा जवळ सापळा रचुन यातील ट्रॅक्टर चालक **आरोपी क्र. १) देवेंद्र सिताराम पातुरकर, वय २८ वर्षे रा. निंबा ता. पारशिवनी** हा आरोपी क्र. २) नामे— किशोर राजेंद्र वैदय, रा. दहेगाव जोशी ता. पारशिवनी ट्रॅक्टर मालक याने अपप्रेरणा दिल्यावरून त्याचे मालकीचे महिंद्रा ५७५ ट्रॅक्टर क्र. एम. एच. ४०/सी.ए.—७८१६ संलग्न बिना नंबरची ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अवैधरीत्या विनापरवाना दहेगाव जोशी शिवारातील कन्हान नदीचे पात्रातुन गौणखनिज (वाळु) ची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीस क्र. १ चे ताब्यातुन १) एक ब्रास रेती किंमती ४,०००/—रू. २) एक महिंद्रा ५७५ ट्रॅक्टर क्र. एम. एच.—४०/सी.ए.—७८१६ किंमती ३,००,०००/—रू. ३) एक बिना नंबरची ट्रॅक्टर ट्रॉली किंमती १,००,०००/— रू. असा एकूण ४,०४,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पोशि राकेश बाबुलाल बंधाटे, पोस्टे पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पोस्टे पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भांदवि. सहकलम ४८(८) महसुल अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. भताने पो.स्टे. पारशिवनी मो. क्र. ९५५२८०४३८८ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत पिपळा डाग बंगला सर्विस रोड ता. सावनेर येथे दिनांक १०/११/२०२३ चे २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— तुषार अशोक भोयर, वय २० वर्ष, रा. वार्ड नं. ०२ दहेगाव रंगारी ता. सावनेर हे आपली मोटरसायकल हिरो होन्डा कंपनीची स्पलेन्डर क्र. एम. एच.—४०/बी.डी.—४०६१ ने दिनांक १०/११/२०२३ रोजी रात्री ०८/०० वा. दरम्यान पिपळा डाग बंगला येथे आठओळी बाजार करण्या करीता गेले असता बाजारात गर्दी असल्याने त्यांनी आपली मोटरसायकल नागपुर सावनेर सर्विस रोडवर पीपळा येथील वांडेच्या दुकाना समोर उभी केली होती व बाजारात भाजीपाला खरेदी करण्याकरीता गेले व भाजीपाला खरेदी करून परत आले असता फिर्यादीची मोटरसायकल उभी ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही. फिर्यादीची जुनी हिरो होन्डा कंपनीची टुव्हीलर गाडी क्र. एम. एच.—४०/बी.डी.—४०६१ किंमती अंदाजे २०,०००/— रूपयाची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार विकास बेलसरे, मो. नं. ९३०९७४१०९५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर